महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५२ वा | दिनांक : ०३/०८/२०२५ | वार : रविवार

## मोर्चा काढायचा तर फडणवीसांच्या बंगल्यावर काढावा - हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** आम्ही शिवसेना आणि भाजपच्या मोर्चाला सामोरे जाण्यासाठी काँग्रेस पक्षाचे कार्यालय टिळक भवन थांबून होतो, पण त्यांचा मोर्चा आमच्या कार्यालयापर्यंत आलाच नाही. जर आले असते, तर त्यांना 'Who Killed Karkare' हे पुस्तक सप्रेम भेट म्हणून दिले असते, असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी लगावला आहे.

भगव्या दहशतवादाला भगवा दहशतवाद न म्हणता सनातन किंवा हिंदुत्ववादी दहशत वाद म्हणा, असे विधान काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज केले. त्यांच्या या विधानावरून एकनाथ शिंदेंच्या शिवसेना आणि भाजपने मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला आहे. यावर हर्षवर्धन सपकाळ बोलत होते.

काँग्रेसला देशभक्तीचे प्रमाणपत्र शिवसेनेने देण्याची गरज नाही. काँग्रेसचा विचार हा पाकिस्तानचे दोन तुकडे करणारा आहे तर पाकिस्तान निर्मितीच्या विचाराला पाठबळ देणारा विचार भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (आरएसएस) आहे. स्वातंत्र्याची लढाई सुरु असताना देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाची मोहम्मद अली जिन्नाच्या मुस्लीम लिगशी युती होती, त्या मुस्लीम लिगच्या सरकारमध्ये भाजप नेते श्यामा प्रसाद मुखर्जी उपमुख्यमंत्री होते, त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मोर्चाच काढायचा तर तो फडणवीसांच्या बंगल्यावर काढावा, असे आव्हान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.


भाजपने हा मोर्चा त्यांच्याच सरकारमध्ये असलेल्या एका मंत्र्याच्या घरावर काढायला हवा होता. या मंत्र्याचे भाऊ 'हू किल्ड करकरे' पुस्तकाचे लेखक आहेत, या पुस्तकात सर्व गोष्टींचा उहापोह आहेच, पण आरएसएसचा थेट संबंध कसा आहे हेही लिहिलेले आहे. त्यामुळे त्यांच्या मोर्चाचे लक्ष्य चुकीचे होते आणि हा मोर्चा काँग्रेस कार्यालयावर आलाच असता, तर त्यांना सामोरे जाऊन हे पुस्तकही त्यांना भेट दिले असते, असा टोला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला.

मुंबई रेल्वे साखळी बॉम्बस्फोट व मालेगाव बॉम्बस्फोट या दोन प्रकरणाचा निकाल न्यायालयाने दिला. रेल्वे बॉम्ब स्फोटातील निकालाविरोधात सुप्रीम कोर्टात जाण्याचा निर्णय राज्य सरकारने लगेच जाहीर केला पण मालेगाव प्रश्नी अद्याप सरकारने भूमिका घेतलेली नाही. मालेगाव बॉम्ब स्फोटातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाल्याविरुद्ध फडणवीस सरकार सुप्रीम कोर्टात जाणार का? हे त्यांनी स्पष्ट करावे. तसेच मालेगाव बॉम्बस्फोट कोणी केला याचे उत्तर मिळाले पाहिजे, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

आयपीएस अधिकारी हेमंत करकरे यांच्याबद्दल महाराष्ट्राला नितांत आदर आहे, त्यांच्याबद्दल कळवळा आहे, ते शहीद झाले. दरवर्षी २६/११ ला त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालता आणि आता त्यांच्याबद्दल बेताल वक्तव्य करता हा देवेंद्र फडणवीस व त्यांच्या बगलबच्यांचा दुटप्पीपणा आहे. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी भाजपाच्या लोकांनी शहीद हेमंत करकरे व तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या सर्व मुलाखती पहाव्यात म्हणजे स्पष्ट होईल.

या प्रकरणात चार्जशीट कसे बदलले, या खटल्यासाठी नियुक्त केलेल्या विशेष सरकारी वकील रोहिणी सालियन यांना प्रकरण सौम्य करण्यास कोणी सांगितले होते, या घटनाक्रमाची निट सांगड घालून पहावे असे सपकाळ म्हणाले. आज हेमंत करकरे आणि आर. आर. पाटील असते, तर मालेगाव खटल्याचा निकाल वेगळा लागला असता, असेही ते म्हणाले.

## सनातन धर्माने भारताचे वाटोळे केले - जितेंद्र आव्हाड



**मुंबई :** सनातन धर्माने भारताचे वाटोळे केले आहे. सनातन नावाचा धर्मच नव्हता. आम्ही हिंदू धर्माला मानणारे आहोत. सनातनी लोकांना विकृत म्हणायला घाबरले नाही पाहिजे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केले. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात कोर्टाने दिलेल्या निर्णयावर बोलताना केलेल्या एका विधानावर प्रतिक्रिया देताना जितेंद्र आव्हाड यांनी हे विधान केले आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी विशेष एनआयए कोर्टाने दिलेल्या निर्णयावर भाष्य करताना कथित भगव्या दहशतवादावर भाष्य केले होते. भगव्या दहशतवादाला भगवा दहशतवाद न म्हणता सनातन किंवा हिंदुत्ववादी दहशत वाद म्हणा, असे विधान करून त्यांनी नव्या वादाला फोडणी दिली. त्यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना जितेंद्र आव्हाड यांनी उपरोक्त मोठे विधान केले.

सनातन धर्माने भारताचे वाटोळे केले. सनातन धर्म नावाचा धर्मच नव्हता. आम्ही हिंदू धर्माला मानणारे आहोत, असे जितेंद्र आव्हाड म्हणालेत.

ज्या सनातन धर्माने आमच्या शिवरायांचा राज्याभिषेक नाकारला, आमच्या छत्रपती संभाजींना बदनाम केले, महात्मा फुलेंचा खून करण्याचा प्रयत्न केला, सावित्रीमायच्या अंगावर शेण, गोटे सगळे टाकले, ज्यांनी शाहूंचा खून करण्याचा प्रयत्न केला, डॉ. आंबेडकरांना पाणी पिऊ दिले नाही, शाळेत जाऊ दिले नाही. त्या सनातन धर्माविरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाऊल टाकत, मनुस्मृती जाळली. मनुचा निर्माता सनातनी परंपरेतून झाला. त्यामुळे सनातन धर्म आणि हे सनातनी लोक विकृत आहेत, असे म्हणायला कुणीच घाबरले नाही पाहिजे, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

माझी व भाजप व काँग्रेसच्या लोकांना नम्र विनंती आहे की, कृपया भगवा दहशतवाद हा शब्द वापरू नका. कारण, भगवा रंग हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या लढ्याचा हा ध्वज (भगवा) आहे. भगवा रंग हा संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व वारकरी पंथाचा रंग आहे. तो महाराष्ट्राला प्रिय आहे. त्याला कुणीही राजकीय लेबल लावू नका. म्हणायचेच असेल तर सनातनी म्हणा, हिंदुत्ववादी म्हणा, पण भगवा म्हणू नका, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले होते.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तरुण आमदार रोहित पवार यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्या विधानाचे जोरदार समर्थन केले आहे. ते आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, 'भगवा हे महाराष्ट्राच्या अस्मितेचा, भावनेचा आणि परंपरेचा विषय असल्याने भगवा शब्दाला दहशतवादाशी कुणीही जोडू नये' माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी मांडलेल्या या भूमिकेत चूक काय? योग्य भूमिकेच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या भाजपा आणि शिंदे साहेबांच्या पक्षातील लोकांनी कोणत्या मुद्द्यांवर आंदोलन करावे याचा आधी अभ्यास केला पाहिजे.

## रक्षा खडसेंनी पुणे रेव्ह पार्टीवर भाष्य करणे टाळले



**जळगाव :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांच्या स्नुषा तथा रोहिणी खडसे यांच्या भावजय केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी पुणे रेव्ह पार्टीवर भाष्य करणे टाळले आहे. मी केंद्रीय मंत्री पदासारख्या एका जबाबदार पदावर आहे. त्यामुळे या प्रकरणातील सत्यता पुढे येत नाही, तोपर्यंत मी त्यावर बोलणे टाळले पाहिजे, असे त्या म्हणाल्यात. त्यांच्या या संयत भूमिकेची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

पुण्यातील कथित रेव्ह पार्टी प्रकरणी रोहिणी खडसे यांचे पती डॉक्टर प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली आहे. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. एकनाथ खडसे यांनी कथित हनी ट्रॅपच्या मुद्द्यावरून भाजप नेत्यांवर विशेषतः मंत्री गिरीश महाजन यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर रेव्ह पार्टीचे प्रकरण पुढे आल्यामुळे याविषयी राजकीय कटकारस्थानाचा वास येत असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणी संपूर्ण कुटुंब संकटात सापडले असताना केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी अत्यंत संयत भूमिका घेत या प्रकरणावर भाष्य करण्यास नकार दिला आहे.

रक्षा खडसे याविषयी पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, सद्यस्थितीत सर्व गोष्टी न्यायालयात गेल्या आहेत. पोलिस सुद्धा त्याची चौकशी करत आहेत. त्यात जी सत्यता आहे, ती पुढे येईल. पण मी आज केंद्रीय मंत्री म्हणून एका जबाबदार पदावर आहे. त्यामुळे कोणत्याही गोष्टीची सत्यता पुढे येत नाही तोपर्यंत मी त्यावर भाष्य करू नये असे मला वाटते. विशेष म्हणजे गत काही दिवसांपासून प्रांजल खेवलकर यांच्या अटकेनंतर खडसे कुटुंब मोठ्या तणावाच्या स्थितीतून जात आहे. त्यामुळे भाजप नेत्या रक्षा खडसे या प्रकरणी कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. पण त्यांनी या प्रकरणी अत्यंत संयत भूमिका घेऊन आपली बाजू स्पष्ट केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३ ऑगस्ट २०२५


## भिलदरीतांडा येथील शेतकऱ्यांचा जलसमाधी आंदोलनाचा ईशारा





**कन्नड (अरुण थोरात):** भिलदरीतांडा ता.कन्नड येथील पाझर तलावाच्या बैकवाटर केटीकम पूलाचे बांधकाम मनमानी पध्दतीने होत असल्याचा आरोप करीतबंजारा ब्रिगेडचे ऋषिकेश चव्हाण व धारासिंग राठोड यांनी जलसमाधी आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे. संबंधित विभागांना दिलेल्या निवेदनानूसार, शेतकऱ्यांना सोयी व्हावी यासाठी शासन दीड कोटीच्या वर रक्कम भिलदरी तांडा येथील पाझर तलावाच्या बॅकवॉटवर केटीकम पूल बांधण्यासाठी देते. परंतु ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमताने व मनमानी कारभारामुळे बांधकाम चुकीच्या पद्धतीने केल्याने शेतकऱ्यांना त्रास होत आहे.या कामामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पेरणी केली नाही. तसेच ज्यांनी पेरणी केली त्यांना शेतात खत व शेतमाल घेऊन येण्या जाण्यासाठी पर्यायी रस्ता करून देण्याबाबत वारंवार तोंडी, फोनद्वारे माहिती देऊन ही पर्यायी रस्ता करून दिला नाही. त्यामुळे येत्या दोन दिवसात शेतकऱ्यांसाठी रस्त्याचे काम सुरू न केल्यास दि. 05 ऑगस्ट रोजी सर्व त्रस्त शेतकऱ्यांना सोबत घेऊन बंजारा ब्रिगेड तर्फे जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांना देण्यात आला आहे.

## तहसिलदार सुरेश घोळवे साहेबांची कालिकादेवी विद्यालयास सदिच्छा भेट



**(शिरूर कासार)** दि.28 जुलै 2025 सोमवार रोजी शिरूर (का.) तालुक्याचे विद्यमान तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब व गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेब यांनी, कालिकादेवी विद्यालयास सदिच्छा भेट दिली. शासण स्तरावरील 'एकाच वेळी वृक्षलागवड मोहिम राबविणे' या अंतर्गत मा.तहसिलदार साहेब यांनी आदेशीत केल्या प्रमाणे, गटशिक्षणाधिकारी कार्यालय,शिरूर (का.) यांच्या वतीने कालिकादेवी विद्यालय,शिरूर (का.) येथे तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख,मुख्याद्यापक व विविध विभागाचे प्रतिनिधी यांनी 'ऑगस्ट 2025 मध्ये एकाच वेळी वृक्षलागवड मोहीम राबविणे' संदर्भात बैठक आयोजित केली होती.त्यानिमित्त कालिकादेवी विद्यालयात, मा.तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब व गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेब यांनी विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब यांची सदिच्छा भेट घेतली. ही पहिलीच भेट असल्यामुळे शिरूर (का.) तालुक्याचे तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब व मा.प्रशांत शिंदे साहेब या उभयतांचे विद्यालयाच्या वतीने प्राचार्य केशव भांगे साहेबांनी मनापासून आभार मानले. आणि शाॅल,श्रीफळ व बुके देऊन स्वागत केले. तालुक्यातील एक नामांकित शाळा म्हणून ओळखली जाणारी 'कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)' या शाळेची पाहणी केली असता; त्यामध्ये शाळेची स्वतंत्र इमारत व तसेच वरीष्ठ महाविद्यालयाची सुसज्ज इमारत,प्रशस्त वर्गखोल्या, भरपूर फर्निचर, भव्य क्रीडांगण, पिण्यासाठी शुद्ध, स्वच्छ असे मुबलक पाणी,वीज,शौचालय,व इतर भौतिक सुविधांची पाहणी केली.तसेच विद्यालयातील विद्यार्थी संख्या,कनिष्ठ महाविद्यालतील तीनही शाखेची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या आणि इ.10 वी वर्गाचा बोर्ड परीक्षेचा निकाल व इ.11 वी 12 वी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल,व दैनंदिन तासिका,अशा विविध उपक्रमांची पहाणी केली असता, समाधान व्यक्त केले.आणि विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच उच्च विद्याविभूषीत असणारा सूज्ञ व अनुभवी,प्राध्यापकवर्ग,शिक्षकवर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची संख्या पाहून कालिकादेवी विद्यालयाचे विशेष कौतुक केले.आणि विद्यमान प्राचार्य केशव रामराव भांगे साहेबांचे मनापासून अभिनंदन केले.तसेच प्राचार्य भांगे सरांच्या सर्व सहकारी टिमला सब्बासकी दिली.शैक्षणिक प्रगतीच्या अनुशंगाने अनेकविध विषयावर सविस्तर अशी चर्चा केली.अशा प्रकारे विविध शासकीय कार्यक्रमासाठी कालिकादेवी विद्यालयाने नेहमीच व मनापासून सहकार्य केले आहे.आजही प्राचार्य भांगे साहेबांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली, अतिशय सुंदर अशी बैठक व्यवस्था उपलब्ध करून दिली त्याबद्दल प्राचार्य भांगे साहेबांचे तहसिलदार मा.सुरेश घोळवे साहेब व गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेबांनी मन:पूर्वक आभार मानले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी : प्रा. डॉ. बाळासाहेब लिहिणार




**करमाड :** येथील राजीव गांधी कला आणि वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात स्वांतत्र्यसेनानी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची 105 वी जयंती लोकप्रशासन आणि राज्यशास्त्र व एन.एस.एस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .एस.एस.मुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.बाळासाहेब लिहिणार यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य व सामाजिक कार्याचा मागोवा घेत असताना म्हणाले अण्णाभाऊ यांच्या साहित्यातून स्त्री पहिल्यांदा नायिका म्हणून अस्तित्वात आली भारतीय साहित्याने स्त्रीला कधीच नायिका न करता ती केवळ साहित्य कृतितील पात्र ठरत होती अण्णाभाऊनी याला छेद दिला आणि एखाद्या साहित्यकृतीची स्त्री नायिका असू शकते हे दाखवून दिले. अण्णाभाऊची नायिका हातात सुरा, कुऱ्हाड, तलवार घेऊन बंड करताना दिसते, .साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे कामगार चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व होते.समाजातील दलित,शोषित आणि उपेक्षित घटकांना न्याय देण्याचे काम त्यांनी त्यांच्या साहित्यातून केले अशी भूमिका त्यांनी मांडली.आजच्या तरुण विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे यांचे जीवन प्रेरणादायी ठरते.याचाही उल्लेख त्यांनी केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.मुळे यांनी अध्यक्ष समारोप करताना विदयार्थ्यांनी अण्णाभाऊ यांचा संघर्ष लक्षात वाटचाल करावी असा संदेश दिला. याप्रसंगी प्रा.मनोज देवकर यांनी देखील अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर व विविध चळवळींवर प्रकाश टाकला. यावेळी विद्यार्थांनी सक्रीय सहभाग घेतला. या प्रसंगी सुरुवातीला प्रस्ताविकामध्ये डाॅ.कालिदास फड यांनी लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करुन आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले कि आज प्रत्येक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करावे असे मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी आय.क्यु.एस.सी समन्वयक डाॅ.नरेश डहाळे यांची प्रमुख ऊपस्थिती होती. महाविद्यालयातील सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डाॅ.किशोर काळे आणि आभार डॉ.रमेश कचरे यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३ ऑगस्ट २०२५


## अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था शाखाध्यक्षपदी प्रा. लीला शिंदे




**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर शाखाध्यक्षपदी ज्येष्ठ बालसाहित्यकार प्रा. लीला शिंदे यांची निवड झाली आहे. शाखेच्या सल्लागार डॉ. छाया महाजन, उपाध्यक्ष प्रशांत गौतम, सचिव डॉ. विनोद सिनकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. मागील सुमारे चार दशकांपासून प्रा.लीला शिंदे या बालसाहित्यात योगदान देत असून त्यांचे नऊ बालकविता संग्रह, आठ बालकथासंग्रह, दोन बालकादंबरिका, दोन बालनाटुकली आणि चरित्रात्मक पुस्तके प्रसिद्ध आहेत. बालसाहित्य चळवळीला अधिक जोमाने पुढे नेण्याचा प्रयत्न संस्थेतर्फे केला जाईल, तसेच माजी शाखाध्यक्ष भा.बा. आर्वीकर यांच्या संकल्पनेतील विविध उपक्रमही प्रत्यक्षात आणले जातील, असे प्रतिपादन याप्रसंगी लीला शिंदे यांनी केले. अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल लीला शिंदे यांचा संस्थेचे सहकार्यवाह डॉ. विशाल तायडे, कोषाध्यक्ष विश्वनाथ ससे, गेणू शिंदे, संदीप भदाणे, संगीता मंडलिक यांच्या उपस्थितीत हा सन्मान करण्यात आला. अखिल भारतीय बालकुमार संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, संजय ऐलवाड, सचिन बेंडभर, सल्लागार सूर्यकांत सराफ, डॉक्टर दासू वैद्य, प्रा. फ. मु. शिंदे आणि साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी लीला शिंदे यांचे अभिनंदन केले आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103


## कर्तव्य बजावताना समाजसेवाही करा : जिल्हाधिकारी स्वामी यांचे आवाहन



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** महसूल विभागाचा संपर्क हा समाजातील सर्वघटकांशी येतोच. जीवनाचा असा एकही भाग नाही की जो महसूल विभागाशी संबंधित नसतो. त्यामुळे महसूल विभागाचे कर्मचारी म्हणून आपण सर्व समाजघटकांशी विनम्रतेने वागले पाहिजे. महसूल कर्मचाऱ्यांनी नोकरीचे कर्तव्य बजावत असताना सामाजिक उपक्रमात सहभाग घेऊन समाजसेवाही करा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.छत्रपती संभाजीनगर उपविभागामार्फत महसूल दिन कार्यक्रमाचे उग्रयोजन शुक्रवारी (दि.1) जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसीलदार कैलास वाघमारे, अपर तहसीलदार डॉ. परेश चौधरी आदी उपस्थित होते. उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांना यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. नायब तहसीलदार सतीश भदाणे, मंडळ अधिकारी कल्याण वानखरे, सहायक महसूल अधिकारी श्रीधर यांडगे, ग्राम महसूल अधिकारी स्वप्निल शेळके, महसूल सहायक शोभा टाक, वाहन चालक एम.एम. शेख, शिपाई समीर शेख, महसूल सेवक अण्णा या कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान आला. जिल्हाधिकारी स्वामी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन के कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कार्य करुन सेवा द्यावी. आपले कर्तव्य हे सेवा देणे हे असून ही सेवा विनम्रत जावी. अद्यावत तंत्रज्ञानाचा अगिया सेवेचा दर्जा उंचवावा, असे आ त्यांनी यावेळी केले. प्रास्ताविक डॉ राठोड यांनी केले. रघुनाथ शेळके, श्री परेश खोसरे जिल्हा अध्यक्ष महसूल कर्मचारी साघटना यांनी आभार मानले.

## डॉ. विनोद सिनकर 'वाचनगुरू' पुरस्काराने सन्मानित




**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी साहित्य संस्थेने शहरातील साहित्यिक शिक्षक डॉ.विनोद सिनकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात वाचनगुरु पुरस्काराने सन्मानित केले. ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख व संदर्भतज्ञ प्रसाद भडसावळे, संस्थाध्यक्ष माधव राजगुरू, कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी यांच्या हस्त पुणे येथे आयोजित समारंभात हा सन्मान करण्यात आला. डाॅ. विनोद सिनकर यांनी गेली तीन दशके वाचन चळवळीत वाचनविषयक विविध उपक्रमांच्या माध्यमातून सरस्वती भुवन शाळेतील तसेच शहरातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावण्यात आणि ती वाढवण्यात यश मिळवले आहे. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सरस्वती भु वन प्रशालेचा विद्यार्थी राहेश कुलकर्णी यास 'वाचनप्रेमी' पुरस्कार व कु.अंजली केने हिला 'वाचनवीर' पुरस्कार प्रदान करण्यात आला.ओंकार विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी गौतमी आजगावकर हिला 'वाचनवीर', देसरडा पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी कु. श्रेया नातू आणि शारदा मंदिर कन्या प्रशालेची विद्यार्थिनी कुमारी निधी कांकरिया याविद्यार्थिनींना 'वाचनभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सर्व विद्यार्थ्यांना विनोद सिनकर यांचे मार्गदर्शन लाभले. स. भु. प्रशालेचे शालेयसमिती अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदानी, मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक अनिल देशमुख, पर्यवेक्षक विजय चापाईतकर, संजय परदेशी तसेच बालसाहित्यिक प्रा. लीला शिंदे, प्रशांत गौतम, डॉ. छाया महाजन आदींनी सिनकर यांच्यासह या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३ ऑगस्ट २०२५

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंनी भारतीय साहित्याला नवा मार्ग दाखविला -प्राचार्य केशव भांगे



**शिरूर (का.) प्रतिनिधी :** दि.01 ऑगस्ट 2025 शुक्रवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' यांची जयंती व 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य सन्माननीय केशव भांगे साहेब यांच्या हस्ते,'लोकशाहीर अण्णाभाऊ साठे' व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी अध्यक्षीय भाषणातून,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा 1 ऑगस्ट हा जन्मदिवस म्हणजे एका क्रांतिकारी साहित्यिकाचा जन्मदिवस होय.खरे तर अण्णाभाऊंनी आपल्या लेखनीतून "भारतीय साहित्यविश्वाला एक नवा मार्ग दाखविला. त्यांच्या लेखनीने लाखो श्रमिक,कष्टकरी,मजूर ऊपेक्षित व वंचितांच्या दु:खाला वाचा फोडली.त्यांची लेखणी एक कलाकृती नव्हती,तर जुलमी व्यवस्थेची चिरफाड करणारी कात्री होती.अण्णाभाऊंच्या साहित्याचे नायक केवळ बंडखोर नव्हते तर समतावादी विचाराचे वाहक होते.तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी इंग्रजांच्या विरोधात दंड थोपटले,आणि 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे.आणि तो मी मिळविणारच' अशी सिंहगर्जणा केली.या विचाराचे आपण स्मरण केले पाहिजे.असा मूलगामी विचार मांडला.तसेच विद्यार्थी वक्ते कु.आराध्या गिते,कु.श्रावणी शिंदे,समृध्दी चांगुणे,रूपाली नेटके,संस्कृती बांगर,प्रांजली औसरमल,कु.संकेशा गायकवाड,निशा भंडारे, चि. राज कांबळे, व शोयब आतार इत्यादींनी अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.त्यानंतर इ.12वी राज्यशास्त्र विषयाच्या साप्ताहिक चाचणी परीक्षेत कु.निशा भंडारे हिने रोख 100/रूपये किंमतीच्या पेनाचे 'प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटाकावले. हे बक्षीस प्राचार्य केशव भांगे साहेब व बक्षीस ठेवणारे प्रा.दता शिंदे सर यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमानेप र्यवेक्षक जनार्दन काळे,विज्ञान विभाग प्रमुख,प्रा.संजय काकडे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.अनिल जरे, प्रा. महारूद्र डोंगरे, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा. संजय आव्हाड, प्रा. नारायण घोलप, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.अशोक इनकर, प्रा. विश्वास ढाकणे, प्रा. महादेव हांगे,प्रा. दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ. अशोक घोडके, प्रा, अशोक सवासे, प्रा. सुनिल मोरे, प्रा. हनुमंत घायाळ, प्रा. बाळासाहेब खटाणे, प्रा. अक्षय रणखांब, प्रा.अमर खोले, प्रा.सविता दराडे, प्रा. रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे, बाळासाहेब येवले, वसंत आहेर, राजू बडे, जयेंद्र निकम,आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर,रोहित शिराळे,प्रशांत राऊत,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे,अक्षय साळवे,जितेश उगलमुगले,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,गौतम भोसले, इत्यादींची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विनोद गलांडे यांनी केले व सूत्रसंचालन डाॅ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.नारायण तांबे यांनी केले.विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ताडपिंपळगाव येथे महाराजस्व अभियानात विविध प्रमाणपत्रांचे वाटप



**कन्नड (अरुण थोरात):** ताडपिंपळगाव ता. कन्नड येथे महसूल दिन व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत विविध सुविधा व प्रमाणपत्र वाटप शिबिराचे दि.०१ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले होते.दि. ०१ ऑगस्ट रोजी महसूल दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार व महसूल मंत्री यांच्या दूरदृष्टीनुसार तसेच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व उपविभागीय अधिकारी कन्नड संतोष गोरड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या नियोजनानुसार तहसील कार्यालय कन्नड च्या वतीने कन्नड च्या आमदार मा. संजनाताई जाधव यांच्या उपस्थितीत ताडपिंपळगाव ता. कन्नड येथे महसूल दिन साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज अभियान च्या निमित्ताने नागरिकांना विविध सुविधा व प्रमाणपत्र दाखल्यांचे तात्काळ वितरण करण्यात आले. या शिबिरात ०३ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, ०५ जात प्रमाणपत्र, ०३ ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र, १६ उत्पन्न प्रमाणपत्र, ०२ रहिवासी प्रमाणपत्राऔचे वितरण करण्यात आले. तसेच सगायो संचिका ०८ प्राप्त झाल्या व राशन कार्ड ०६ ऑनलाईन करण्यात आले. विशेष म्हणजे ताडपिंपळगाव येथील श्री संत सावता सभागृहाच्या जागेच्या नावामध्ये बदल च्या प्रकरणांमध्ये माहिती प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी श्री गोरड यांनी तात्काळ नोंद घेण्याचे ग्राममहसूल अधिकारी ताडपिंपळगाव व मंडळ अधिकारी देवगाव रंगारी यांना आदेश दिले. ग्राम महसूल अधिकारी व मंडळाधिकारी यांनी २५ मिनिटांमध्ये नोंद घेऊन व प्रमाणित करून सातबारा तयार करून संबंधितांना आ. संजनाताई जाधव यांच्या हस्ते सदर सात बारा चे वितरण करण्यात आले यावेळी नागरिकांनी तात्काळ सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी नायब तहसीलदार श्री काळे, श्री सोनवणे, सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, अधिकारी, सेतू सुविधा केंद्र संचालक, सरपंच श्रीमती सोनवणे व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसिलदार श्री कडवकर यांनी केले. त्यामध्ये रस्ता प्रकरणे दाखल करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तसेच ॲग्री स्टॅक नोंदणी व फार्मर आयडी तयार करण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे आ. संजनाताई जाधव यांनी मार्गदर्शन करून महसूल प्रशासनाकडून लोकांच्या मोठ्या प्रमाणात अपेक्षा असून त्या अधिक गतिमान पणे पूर्ण व्हाव्यात ही अपेक्षा व्यक्त केली. ग्रामीण भागात तहसील कार्यालयाने येऊन सुविधा व दाखल्यांचे वाटप केले याबद्दल समाधान व्यक्त केले. आभार प्रदर्शन ग्रामपंचायत अधिकारी ताडपिंपळगाव यांनी मानले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३ ऑगस्ट २०२५

# बालमित्रांची छान छान गाणी




मी असं ऐकले आहे " करील मनोरंजन जोजो मुलांचे,जमेल नाते प्रभुशी तयांचे." मुलांचे मनोरंजन करणारे अनेक बाल कथा,बाल कविता,बाल कादंबरी ,बालनाट्ये,अशी अनेक प्रकारची साहित्य कृती आज उपलब्ध आहेत.आणि दररोज निर्माण होत आहेत. मुलांच्या मनाच्या आणि त्यांच्या,व्यकतिमत्व विकासाच्या जडन घडणीत या साहित्य कृतींचा सिंहाचा वाटा आहे हे नक्कीच. पण नुसतेच मनोरंजन करुन मुलांच्या मनाची जडन घडन होत नाही.आपल्या रोजच्या जेवणात विविध जीवन सत्वांचा सामावेश असावा लागतो.असा आहार घेतला तर आपल्या शरीराची उत्तम वाढ होते. रोग प्रतिबंधक शक्ती वाढून शरीर सशक्त व निरोगी बनते. जसं शरीराच्या बाबतीत तसेच मनाच्या बाबतीतही असते.मुलांच्या मानसीक वाढीकडे लक्ष द्यायचे असेल तर चांगले संस्कार,आणि संस्कारमय वातावरण हवे असते.ही मानसिक वाढ आजू बाजूच्या संस्काराने होते. मग ते संस्कार,कुटुंबातून
आई,वडील,भाऊ,बहिण,इ.कडून नंतर पुढे सामाजीक म्हणजे मित्र मंडळी,शेजारी,इ.म्हणजे समाजा कडून,आणि मग शाळेतून,शाळेत संस्कार करणारे गुरुजी.जसे उत्तम संस्कार करतील तसे उत्तम विद्यार्थी तयार होतीलआणि हेच विद्यार्थी उद्याचे उत्तम नागरीक असतात.त्यांच्या खांद्यावर उद्याच्या देशाची धूरा असणार असते.म्हणून शाळेतून त्यांना तसे कसदार संस्कार मिळेल अशी अपेक्षा असते.तसे संस्कार करणारे गुरुजी हवेत. कारण गुरुजीच,शास्त्रज्ञ,डॉक्टर,सनदी
अधीकारी,इंजीनिअर,समाज सेवक निर्माण करु शकतात.म्हणजेच गुरुजी नवे शक्तीशाली,संस्कारीत राष्ट्र निर्माण करु शकतात.असे मला वाटते.तर असे हे संस्कार करणारे संस्कारी साहित्यही मुलांपुढे येणे गरजेचे आहे.असे माझे मत आहे. त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास मदत होते. असेच मुलांच्या मनावर एक सुसंस्कार करणारे,मुलांच्या मनाची जडण घडण करणारे शिक्षक बालकवी श्री प्रदिप कुमार गुरुजी,पिंपळनेर कर हे बालमित्रांची छान छान गाणी हा बालकाव्य संग्रह घेऊन बालसाहित्य क्षेत्राच्या क्षितीजावर आले असुन त्यांच्या आपल्या या संग्रहातील कविता मुलांचे मन निश्चितच सात्विक, सशक्त,आणि संस्कारीत बनवतील अशी मला खात्री वाटते. आई बाळाला घास भरवते.तो घास सर्व जीवन सत्वांनी परिपुर्ण असतो.मोठ्या मायेने आई तो घास चिऊ,काऊ ची गोष्ट सांगून भरवत असते.अगदी तसेच प्रदिप गुरुजींनी प्रत्येक कवितेच्या माध्यमातून सुंदर संस्काराची सहज पेरणी केली आहे.आणि अशा पध्दतीने यि संस्कारांची पेरणी केल्या मुळे ती निश्चितच कायम स्वरुपी मनात रुजणार आहे. आजच्या डिजीटल युगात जगाच्या स्पर्धेत टिकायला मुले सक्षम झाली पाहिजेत.हे कवीने हेरले आहे.म्हणून मनोरंजनाबरोबरच नव्या डिजीटल कविता या काव्यसंग्रहात कविने सहजच साध्या साध्या प्रसंगातूनहसांगून आधुनिक, डिजीटल संदेश दिला आहे. त्यांच्या या बाल काव्यसंग्रहात एकंदर पासष्ट बालकविता आहेत.भरपुर चित्रांनी युक्त अशा एका पेक्षा एक सरस बाल कविता या संग्रहात संग्रहीत आहेत.पैकी मला भावलेल्या काही कवितांचा मला येथे उल्लेख हमखास करावासा वाटतो. माझं नाव.. या बालकवितेतील या प्राण्यांची ओळख करुन देणा-या काही ओळी.......म्यांऊ,म्यांऊ.दूदू पिऊ.नाव माझं मनी माऊ.सुरु सुरु पळते. शेंगा शोधते.माझं नावखारुताई.उधळून चाल.धरतो ताल.नाव माझंघोडोबा. या बरोबरच आधुनीक जगाला सामोरे जाणारी,आधुनीक साधनांची ओळख करुन देणारी रोबोट ही बालकविता निश्चितच संस्कारी आहे. बघा..घर काम करायला.झाडू मारायला.फरशी पुससायला.स्वयंपाक करायला.आला नवा माणूस.त्याचं नाव रोबोट.अवकाशात जायला.मंगळावर फिरायला.गृह तारे मोजायला.हवामान सांगायला.नविन शोध लावायला.आला नविन माणूस.त्याचं नाव रोबोट.ऑपरेशन करायला.डॉक्टरांच्या मदतीला.डोळे तपासायला.फोटो काढायला,आला नविन माणूस,त्याचं नाव रोबोट. या तंत्रज्ञानाच्या युगात नवनविन शोध लागत आहेत.मुलांनी या नव्या आव्हानाला सामोरे जायचे आहे.त्याचे गुलाम व्हायचे नाही,नाहीतर हे तंत्रज्ञान शाप ठरू शकते.परंतू आज मोबाईल च्या युगात आम्ही पालकच मोबाईलचे गुलाम झालो आहोत. मग मुलांचे कसे ?कविला यांची खंत वाटते आहे.मोबाईल या कवितेत.'आमच्या घरी पाव्हुणा आला.गंमत जंमत सांगू लागला.नाव सांगीतलं मोबाईल.सांगीतलं सगळं ऐकतो.आदेशाचे पालन करतो.रॉग नबरसी बोलत नाही.गप्पांचा कंटाळा करीत नाही !!अंगी त्यांच्या नाना कळा.कळा दाबताच दाखवी लिला.व्हा◌ॅटस् अप,व्हिडीओ का◌ॅल,त्यांचे लहान थोर भाऊ !!दिवसा भरात सगळीकडे बोलचाल,थकवा त्याला येत नाही.'आणि शेवटी,शेवटच्या ओळी,माणूस कसा मोबाईलच्या आहारी गेला आहे,ते पहा.........'असा आमुचा पाहुणा.त्यांच्या शिवाय करमत नाही.तो सोबतीला असल्या शिवाय घरात कोणी जेवणच नाही.' मुलांना चांगल्या सवयी लावण्याचे कार्य काही कवितेतून केलेले दिसून येते. मी आधीच सांगीतले आहे की,मुलांना चांगल्या सवयीचे डोस पाजणा-या कविताया संग्रहात अनुभवयास मिळतात. मुलांना गोड बोलुन,चांगल्या संस्काराची पेरणी जागोजागी केलेली आहे.असे निदर्शनास येते.आणि हेच या बाल काव्य संग्रहाचे खास वैशिष्ठ्य सांगता येईल असे मला वाटयते.जसे...'बाळा जरा जपून ही रचना पहा..'केळी खाऊन साल त्याचीकचरा पेटीत टाकीत जा.' पाणी भरल्यावर,नळाची छोटी,आठवण ठेऊन,बंद करीत जा.आणि पुढे...... शौच झाल्यावरआपले हात,स्वच्छ साबनाने.धुवत जा !' अशाच आणखीही काही उल्लेखनीय कविता या संग्रहात आहेत की ज्याना सगळ्यांना येथे उद्धृत करणे शक्य होत नाही. जसे....'दोस्ती आपुली ही वर्तमान पत्रातीशी.' 'आपले अधिकारी', 'माझे शरीर माझे अवयव,' 'सण माझे रंगी बेरंगी,'. 'चविचे गाणे', 'चित्रातले घर,'. 'ड्रोन'. इ. मुलांना भविष्यातील शतकाकडे नेणा-या, नव्या धाटणीच्या,ह्या बाल कविता वाटतात.कवि प्रदिप कुमार पिंपळणेरकर गुरुजींची दुरदृष्टी,मुलांना घेऊन आकाशात झेपावणारी असीच आहे. त्यांना त्यांच्या दुरदृष्टी पणाला यश येवो. त्यांची काव्य प्रतिभेचे,आणि काव्य सृष्टीचे काव्य नंदनवनात रुपांतर होवो, ही सदिच्छा. त्यांचे पुढील काव्य प्रवासासाठी हार्दिक अभिनंदन ! आणि. हार्दिक शुभेच्छा.!! धन्यवाद.

**बाल मित्रांची छान छान गाणी**
(बाल काव्यसंग्रह) प्रदिप गुरुजी पिंपळनेर कर, "रमाई सुतं"
ह्रदय प्रकाशन. 1902 सी,
महाराणा प्रताप चौक सोमवार पेठ,
कोल्हापूर
मो.न. 9922314564.
मूल्य --160.

**समिक्षण.**

**श्री तात्याराव पुंजाबा पवार**
(औरंगाबाद) छत्रपती संभाजी नगर.
मो.न:- 7798283055.

# बालरंगभूमीच्या अभिनय स्पर्धेत अबीर पाठक, ईशान तोष्णीवाल, वीरा चांदोडकर हे सर्वोत्कृष्ट तर गौरी गुजराती, ऋतुजा साबळे, मिष्टी रगडे हे उत्कृष्ट बालकलाकार ठरले.



**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची संलग्न संस्था बालरंगभूमी परिषद या संस्थेतर्फे दोन ऑगस्ट हा मराठी बालनाट्य दिवस म्हणून साजरा करतात यानिमित्ताने छत्रपती संभाजी नगर जिल्हा शाखेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी अभिनय स्पर्धेचे आयोजन स्वामी रामानंद तीर्थ संशोधन मंडळचे सभागृह नागेश्वर वाडी रोड औरंगपुरा या ठिकाणी करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्‌घाटन बालकांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी स्पर्धेचे परीक्षक अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे, नाट्य सिने अभिनेते नाना मोरे, छत्रपती संभाजी नगर जिल्हा शाखेचे अध्यक्ष आसेफ शेख (अन्सारी), सह कार्यवाह अर्चना देवधर, कार्यकारणी सदस्य रमेश सोळुंके, लक्ष्मण अहिरे, संतोष कुलकर्णी उपस्थित होते. सहभागी सर्व बालकलावंतांचे गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत भातलौंढे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड, उपाध्यक्ष वाल्मिक जाधव, प्रकाश सुरवसे, रूपाली आल्हाट, राहुल रगडे यांच्या सह बालरंगभूमी परिषदेच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या बालकलाकारास 500 रु. स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र उत्कृष्ट बालकलाकारास 300 रु. स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र उत्तम सादरीकरण करणाऱ्या बालकास 200 रु. स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र आणि प्रशंसनीय पुरस्कार प्राप्त बालकलाकारास स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. अभिनय स्पर्धेचा निकाल : इयत्ता 1 ली ते 4 थी या गटातून सर्वोत्कृष्ट अबीर पाठक, उत्कृष्ट गौरी गुजराथी, उत्तम प्रिशा पवार, प्रशंसनीय ऊर्वी लंके व स्वरा वाघिरे. इयत्ता 5 वी ते 7 वी या गटातून सर्वोत्कृष्ट ईशान तोष्णीवाल, उत्कृष्ट ऋतुजा साबळे, उत्तम अनुष्का कुलकर्णी, प्रशंसनीय शौर्या चांदोडकर व अमोघ कुलकर्णी विशेष प्रमाणपत्र मानसी गुजराथी. इयत्ता 8 वी ते 10 वी या गटातून सर्वोत्कृष्ट वीरा चांदोडकर, उत्कृष्ट मिष्टी रगडे , उत्तम आर्या झाल्टे प्रशंसनीय सानवी देशपांडे व प्रांजली त्रिभुवन हे बालकलाकार पुरस्कार प्राप्त ठरले.